NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# भारतीय स्त्रीवादी चळवळ

**डॉ. सौ. उर्मिला महेश चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग, मिरज महाविद्यालय, मिरज.

.......................................................................................................................................

**प्रस्तावना :—**

भारतीय स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करताना प्रथम चळवळ हा शब्द समजावून घेणे महत्त्वाचे आहे. एखादा सामाजिक उद्रेक किंवा मोहिम दीर्घकाळ चालू राहिली की त्याला चळवळ असे म्हणतात. एम्. एस्. ए. राव यांच्यामते आधीच निश्चित केलेल्या किंवा नंतर निर्माण झालेल्या एखाद्या आदर्शवादावर आधारुन सामुदायिक संघर्षाच्याद्वारे जे अविरत प्रयत्न होत असतात त्यांना चळवळ असे संबोधण्यात येते.[१] स्त्री—मुक्ती चळवळ ही एक सामाजिक चळवळ आहे. सामाजिक म्हणजे समाजाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने होणारी सामुहिक कृती होय. कोणतीही सामाजिक चळवळ ही स्थिर, सुव्यवस्थित व सुसंघटित असत नाही. कारण सामाजिक चळवळीचे सदस्यत्व, नेतृत्व आणि उद्दिष्टांमध्ये नेहमी बदल होत असतात.[२] भारतीय महिला चळवळ ही प्रथमपासून एक बहुमुखी स्वरुपाची, बहुवर्गीय, प्रासंगिक वेळोवेळी उद्भवणाऱ्या समस्यांवर आधारित आणि स्वायत्त चळवळ आहे.

**भारतीय स्त्रीवादी चळवळ**

भारतीय स्त्री चळवळीचा अभ्यास करताना ती १९ व्या शतकात सुरु झालेल्या समाजसुधारणा चळवळीपासून अभ्यासावी लागते. समाजसुधारणा चळवळीचा अभ्यास केला तर आपल्याला राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या सतीप्रथाबंदी पासून ते महात्मा फुले, लोकहितवादी सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केलेल्या कार्याचा अभ्यास म्हणजे स्त्रीवादाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण भाग मानावा लागेल. या अगोदरच्या काळात पहिली महिला मंडळे, आर्य समाज व ब्राम्हो समाज यांच्यासारख्या हिंदू धर्मातील पुनरुज्जीवनवादी व सुधारणावादी पंथांनी निर्माण केली होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला भाषिक, धार्मिक आणि समाजकल्याणाच्या उद्देशाने स्त्रियांच्या अनेक संघटना निर्माण झाल्या. संपूर्ण देशभर त्याचे लोण पसरले. मद्रासमध्ये सुब्बालक्ष्मी अम्मल यांनी एक ब्राम्हण महिलाश्रम स्थापन केला. म्हैसूरमध्ये महिला सेवा समाजाची स्थापना झाली. पुण्यात भगिनी समाज उभा राहिला. बडोद्यात चमनबाई प्रसुतीगृह आणि बालकल्याण मंडळ स्थापन झाले.[३]

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात अनेक स्त्रियांनी धाडसाने पुरुषाच्या बरोबरीने सहभाग घेतला.स्वदेशीच्या चळवळीत स्त्रियांनी पुढाकार घेतला. त्यानंतर १९४२ साली अखिल भारतीय स्त्री परिषद १९४२ साली स्थापन झाली. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर स्त्रियांना स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागामुळे मतदानाचा राजकीय हक्क पुरुषाच्या बरोबरीने मिळाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कायदामंत्री बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांसाठीच्या हिंदू कोडबिलाचा आग्रह धरला. त्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांना कायदा मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. कालांतराने स्त्रियांना वारसाहक्क व घटस्फोटाचा, पोटगीचा हक्क याच कायद्याच्या आधारे प्राप्त झाला. १९५० ते १९७५ पर्यंत भारतातील स्त्रीचळवळ थंडावली होती.

१९७५ मध्ये महिलांची मेक्सिको येथे जागतिक महिला परिषद संपन्न झाली. १९७५ हे संयुक्त राष्ट्रसंघाने महिला वर्ष म्हणून जाहीर केले. त्याबरोबरच १९७५ ते १९८५ महिला दशकाची घोषणा केली. युनोने आपल्या मानवी हक्क सनदेतून सर्व प्रकारच्या विषमतेला विरोध दर्शविलेला होता. जगातील सर्वच राष्ट्रात स्त्री—पुरुष विषमता होती. धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा यांच्या नावाखाली तिचे समर्थन करण्यात येत होते. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभेने महिला वर्ष व महिला दशकाच्या सनदेचे वर्णन इतिहासाने केलेल्या चुका दुरुस्त करण्याचा प्रारंभ असे केले होते.[४]

१९८० साली कार्याचा आढावा घेण्यासाठी कोपनहेगन येथे परिषद झाली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे देशाच्या सरकारच्या प्रतिनिधी मंडळाच्या बरोबरीने बिगर सरकारी मंडळाच्या प्रतिनिधींना (NGO) उपस्थित राहण्याची परवानगी मिळाली. या प्रतिनिधी मंडळांना समांतर परिषद घेण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर मुख्य परिषदेत निरिक्षक म्हणून बसण्याची संधी मिळाली. यानंतरच्या काळात सर्वच देशांमध्ये स्त्रियांच्या विकासाला चालना दिलेली दिसते. सरकारी व बिगर सरकारी संघटना जोमाने काम करु लागल्या.या दोन परिषदांमध्ये भारतातील स्त्री कार्यकर्त्या व शासनाचे प्रतिनिधी सामील झाल्यामुळे इतर राष्ट्रातील पाश्चात्य स्त्री–मुक्तीवादी चळवळीशी व विचारांशी संपर्क आला आणि त्यामुळे स्त्रीचळवळीत फार मोठे परिवर्तन झाले. स्त्रिया संघटित होवू लागल्या. अनेक स्त्री संघटना स्त्रियांच्या प्रश्नांसाठी पुढे येऊ लागल्या. महिला दक्षता समिती १९७७, स्त्रीमुक्ती संघटना १९७८, अत्याचार विरोधी मंच १९८०, नारी समता मंच १९८०, क्रांतीकारी महिला संघटना १९८१, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना १९८१ इत्यादी.

१९८० च्या सुरुवातीला मुंबईत लाल निशाण पक्षाच्या पुढाकाराने स्त्रीमुक्ती संघटना स्थापन झाली आणि तिने भित्तीपत्रकांचे प्रदर्शन भरवले, सभा भरविली, समाजवादी महिला गटाने अभ्यासवर्ग घेतले. हैद्राबादमध्ये 'प्रोग्रेसिव्ह ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन' ची जागा आता स्त्री शक्ती संघटनेने घेतली. दिल्लीत 'स्त्री संघर्ष आणि महिला दक्षता', मद्रासमध्ये 'पेन्नुरामाई इय्यकम', बेंगलोरमध्ये 'विमोचना' अशा नव्या संघटना याचवेळी निर्माण झाल्या.[५] महाराष्ट्रातही फोरम अगेन्स्ट ऑपरेशन, स्त्री मुक्ती संघटना, मैत्रिणी, नारी समता मंच, क्रांतिकारी महिला संघटना, श्रमिक मुक्ती संघटना, फोरम अगेन्स्ट रेप, मनस्विनी, तलाक मुक्ती मोर्चा समिती अशा अनेक संघटना आहेत. हैद्राबाद येथील स्त्रीशक्ती संघटनेने 'आम्ही इतिहास घडवित होतो' तेलंगण जनवादी लढ्यातील स्त्रियांच्या जीवनगाथा (We were making History, 1989) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात पुरूषसत्तेचा दुहेरीपणा मांडण्यात आलेला दिसतो. चळवळ संपल्यावर शस्त्रधारी स्त्रियांना कुटुंबात परत जाण्याचे आदेश दिले. या स्त्रिया पुरूषी नियंत्रण, लैंगिकता, गरोदरपणा, अपत्य संगोपन, पुरूषांशी भिन्न स्तरावर येणारे अपरिहार्य संबंध यावर बोलल्या. त्यामध्ये असे दिसते की, ही चळवळ कुटुंबाच्या तुरुंगापासून सुटका देणारी व स्त्रियांच्या काचणाऱ्या व्याख्यापासून सुटका देणारी चळवळ होती. परंतु चळवळीतील पुरूषी नेतृत्व स्त्रियांकडे साधन म्हणून पहात होते.[६]

१९८५ साली मधु किश्वर यांनी तीन भागात भारतातील स्त्रीवादी विचारांच्या इतिहासाच्या दृष्टीने शोधनिबंध लिहला. यामध्ये हुंडाबळी, कुटुंबांतर्गत हिंसाचार, पोलिस कोठडीतील बलात्कार याविरुध्द आवाज उठविणाऱ्या स्त्री चळवळीने घटनेतून मिळालेल्या समान दर्जाच्या अश्वासनातील फोलपणा दाखविला आणि कायद्यातील अपुरेपणाही मांडला. मधु कीश्वर 'मानुषि' मासिकाचे संपादन करणारे म्हणून प्रसिध्द आहेत. समकालीन स्त्रीवादाचे गांधींच्या विचारांशी असणारे नाते त्यांनी वेगळ्या पध्दतीने मांडले. मधु कीश्वर यांनी आपल्या लेखातून स्त्रीवादी चळवळ बांधू पाहणाऱ्या समकालीनांना असे सुचविले आहे की स्त्री प्रश्नांचा विचार करताना गांधींच्या विचारांची सम्यक चिकित्सक दखल घेणे गरजेचे आहे.[७] १९८५–८६ साली शहाबानो खटल्यात न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे शहाबानोला पोटगी जाहीर झाली. तेव्हा मुस्लिम समाजात उलट–सुलट चर्चा झाल्या. त्यावेळी पंतप्रधान राजीव गांधी यांनी मुस्लिम महिला हक्क संरक्षण विधेयक पास करुन त्यांच्या रिवाजाप्रमाणे तलाक पिडीत स्त्रीला वक्फ बोर्डाकडून पोटगी मिळावी अशी तरतूद केली. धर्मनिरपेक्षतेचा मोठा पराभव झाला. शहाबानो खटल्यामुळे स्त्रीमुक्ती चळवळीची 'धर्मनिरपेक्ष समान नागरी कायदा' ही मागणी अनेक दशकांनी मागे ढकलली गेली. या पार्श्वभूमीवर मेहरूनिस्सा दलवाई यांनी या काळात तलाक पिडीत स्त्रियांना एकत्र केले. मुस्लिम वक्फ बोर्ड सक्षम तऱ्हेने चालत नाही तेव्हा १२५ कलमाखाली तलाक पिडीत महिलेला न्याय मिळाला पाहिजे अशी भूमिका घेतली व पुरूषी पध्दतीबाबत जागृतता आणली.[८]

१९८७ साली राजस्थानातील देवराला येथे रूपकुंवर नावाची नववधू सती गेली तेव्हा अनेक स्त्रीसंघटनांनी या घटनेविरोधात देशभर आंदोलने केली. सतीचा कायदा असूनही त्याचा वापर न करणे, पोलिसांची निष्क्रियता, मुलींना गुंगीचे औषध देणे अशा अनेक गोष्टी स्त्रीसंघटनांनी समाजापुढे आणल्या. सती कायद्यामध्ये बदलाची मागणी स्त्रीसंघटनांनी केली.[९] त्याचबरोबर हुंड्यासारख्या सामाजिक समस्येवरही जरी १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायदा निर्माण झाला. हुंड्यासाठी स्त्रियांना देण्यात येणारा मानसिक व शारीरिक त्रास त्यातून घडणाऱ्या हत्या व नंतर तो अपघाती मृत्यू किंवा आत्महत्या आहे हे भासवणे हे आजही समाजात दिसून येते. १९६१ नंतरही देशात फार मोठ्या प्रमाणात हुंड्यासाठी स्त्रियांचा छळ केला जात होता. तेव्हा विविध स्त्रीसंघटनांनी हुंड्याबद्दलचा कायदा बदलावा म्हणून देशभर निदर्शने केली. त्याचा परिणाम म्हणून १९८६ मध्ये दहेज विरोधी कायदा नव्या स्वरूपात आला.

२००१ च्या जनगणनेनुसार मुलींचे प्रमाण मुलांच्या मानाने खूपच कमी दिसून आले. तेव्हा स्त्रीसंघटनांनी गर्भलिंग परीक्षेला विरोध केला. कारण भारतात १००० पुरूषांमागे ९२७ इतके मुलींचे प्रमाण झाले होते. १९९४ साली गर्भलिंग चिकित्सा कायदा करूनही भारतीय समाजात स्त्रीभृणहत्या होत होत्या हेच सिध्द झाले. अलिकडेही मोठ्या प्रमाणात समाजात स्त्रीभृणहत्या होताना दिसतात. देशातील काही राज्यांसह महाराष्ट्रातही मुलींच्या प्रमाणात मोठी घट निर्माण झालेली दिसते. तेव्हा पीसीपीएनडीटी कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. एशियन सेंटर फॉर ह्युमन राईटने पीसीपीएनडीटीवर अभ्यास केला. त्यांच्या मते या कायद्यांतर्गत हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्रात सर्वाधीक तक्रारी नोंदविण्यात आल्या असल्या तरी मुलींचे घटते प्रमाण पाहिले तर तक्रारींची संख्या समाधानकारक नाही. तेव्हा सरकारने कडक ठोस पाऊले उचलली पाहिजेत. स्त्री जन्माची जपणूक व तिच्या हक्क, अधिकारांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या या राज्यात बेटी बचाओ योजनेप्रमाणे इतरही योजना प्रभावीपणे राबविल्या गेल्या नाहीत. यंत्रणेकडून वेळेवर न मिळणारे निधी, अंमलबजावणीतील कच्चे दुवे, व्यवस्थेची आनास्था, तांत्रिक बाबींचा अडसर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लागणाऱ्या सामाजिक व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यामुळे हा कायदा महाराष्ट्रासह अन्य सहा राज्यात प्रभावीपणे काम करू शकला नाही अशी या अहवालात खंत व्यक्त केली आहे[१०]

सध्या भारतात सन २०११ च्या जनगणनेच्या अहवालानुसार देशाचे ० ते ६ वयोगटातील लिंग गुणोत्तर प्रमाण ९१४ आहे. हे प्रमाण १९९१ मध्ये ९२४ आहे. हे प्रमाण २००१ मध्ये ९२७ इतके होते. हुंडा विरोधी कायदा १९६१, घरगुती हिंसाचार कायदा २००५ हे कायदे स्त्रियांसाठी निर्माण केले. परंतु अजूनही समाजात बलात्कार, हुंडाबळी, घरगुती हिंसाचार, मारहाण, परितक्त्यांचे प्रश्न दिसून येतात. या विरोधात स्त्रीसंघटनांनी सुरुवातीपासून प्रयत्न केलेले दिसतात.

अलिकडे तिसरी महिला हिंसामुक्ती परिषद नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात संपन्न झाली. या परिषदेस सावित्रीबाई फुले अध्यासन, संगीनी महिला जागृती मंडळ, सेहत, साद संवाद फाऊंडेशन, स्नेहा, अक्षरा, मासूम, इत्यादी महिला संघटना या परिषदेस उपस्थित होत्या. या परिषदेत स्त्रीवादी कार्यकर्त्या कमला भसिन यांनी असे मत व्यक्त केले की, राज्यघटनेने महिलांना देशात समान अधिकार दिल्यानंतरही देशात अद्यापही पुरूषसत्ताक पध्दती अस्तित्वात आहे. समाज व संस्कृतीमधील पुरूषप्रधान रचनेमुळे बहुसंख्य पुरूष चुकीच्या संकल्पनांना प्रोत्साहन देतात. परिणामी महिलांच्या हिंसाचारात वाढ झाली आहे.

महिलांवरील अन्यायाला वाचा फोडणाऱ्या आंदोलन अन् चळवळीमध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. त्यासाठी म. ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुध्दांसारख्या पुरूषांनी महिलांच्या समानतेस स्थान दिले आहे. महिला आंदोलन हे महिला हक्कासाठी असले तरी पुरूषांविरोधी नाही. अनेक पुरूष स्त्रीमुक्तलच्या आंदोलनात साथी आहेत. मात्र

पुरूषप्रधानतेचा अंत झाल्याशिवाय स्त्रीमुक्ती शक्य नाही. म्हणून पुरूष प्रधानतेची पाळेमुळे नष्ट केली पाहिजेत.[११]

स्त्रीवादी विचारवंत स्त्री हक्क चळवळीच्या कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी स्त्रियांसाठी अविरत कार्य केले. 'मिळून साऱ्याजणी' हे महिलांशी आणि साऱ्या समाजाशी संवाद साधणारे मासिक त्यांनी लोकवर्गणीतून सुरु केले. त्याआधी 'नारी समता मंच' या संघटनेने प्रामुख्याने शहरी व मध्यमवर्गीय महिलांशी संवाद साधण्यास सुरुवात केलीच होती. 'नारी समता मंचा'ने शैला पाटकर आणि मंजुश्री सारडा या दोन सुशिक्षित सधन घरातील विवाहितांच्या खूनाची प्रकरणे हातात घेतली. त्यानंतर मंचाकडे छोटे—मोठे अन्याय सोसणाऱ्या स्त्रियांची रीघ लागली. विद्याताई एकाच वेळी स्त्री आणि पुरूष या दोघांच्याही उन्नयनाचा विचार करीत असत. त्या नेहमी म्हणत बाईच्या शृंखला गळून पडण्यात शेवटी पुरूषांचाही फायदा असतो.[१२]

१९८६ साली शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी चांदवडला शेतकरी महिला परिषद भरविली. या परिषदेस जवळ जवळ ५० हजार शेतकरी स्त्रिया उपस्थित होत्या. त्यांनी राजकारणात सहभागी होण्याचा निर्धार केला. दुसरी परिषद १९८९ साली अमरावती येथे भरविली होती. शेतकरी संघअनेच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय कृती कार्यक्रमात महिलांना समाविष्ट करून त्यांच्यामध्ये सक्षमीकरणाची दृष्टी निर्माण करण्यात संघटनेने पुढाकार घेतला. दारुबंदी, लक्ष्मीमुक्ती, जिल्हा परिषद कब्जा आंदोलन, स्वयंसिध्दा प्रकल्प इत्यादींमुळे महिलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास व धाडस निर्माण करण्याचे श्रेय संघटनेला द्यावे लागते. [१३]पर्यावरणाच्या संरक्षणासाठीचा लढा किंवा मोठ्या धरणांना विरोधासाठीचा लढा यासारख्या आंदोलनामध्ये तर स्त्रिया आघाडीवर आहेत. हिमालयाच्या डोंगराळ गढवाल प्रदेशातील सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखालील जंगलतोडी विरुध्द चाललेले चिपको आंदोलनातील स्त्रियांचा सहभाग अथवा नर्मदा बचाओसाठी मेधा पाटकर यांनी केलेली आंदोलने महत्त्वपूर्ण आहेत. चिपको आंदोलनात सुंदरलाल बहुगुणा, गौरा देवी, कॉम्रेड चन्डीसिंह रावत आणि रेणी गावातील २७ स्त्रियांनी २४०० झाडे वाचविण्यासाठी प्राणाची बाजी लावली. या आंदोलनामुळे हिमालयातील झाडे तोडण्यास तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १५ वर्षे बंदी घातली होती.

वंदना शिवा या पर्यावरणीय स्त्रीवादाची मांडणी करतात. जागतिक eco feminist movement मध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. १९९३ मध्ये वंदना शिवा आणि मारिया माईस यांनी ecofeminism नावाचे पुस्तक लिहले. त्यात त्यांनी पाश्चात्य आणि दाक्षिणात्य स्त्रीवादाची मांडणी केली. तसेच काही स्त्रीवादी कार्यकर्त्या आदिवासी स्त्रियांना संघटित करतात. त्यांचे पाणी, आरोग्य, शिक्षण याविषयी प्रश्न जाणून घेऊन त्याबाबत कार्य करतात.

भारतातील स्त्रीवादाविषयी जाणून घेताना १९७० नंतरच्या स्त्रीवादी कार्यकर्त्यांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील. प्रेम चौधरी यांनी लिंगभेद, स्त्रिया आणि हिंसा यावर अभ्यास केला आहे. मिरा गुप्ता, मेघा पंत, ब्रिंदा करात या ऑल इंडिया डेमॉक्रॅटिक वुमन्स असोसिएशनच्या सदस्या आहेत. मानुषी मासिकाच्या संपादिका मधु किश्वर, सेंटर ऑफ वुमन्स स्टडीजच्या संचालिका आणि भारतातील स्त्रियांच्या दर्जाविषयी संशोधन करणाऱ्या वीणा मुजुमदार, स्त्रिया आणि पर्यावरणाच्या अभ्यासक विदूषी वंदना शिवा, सामाजिक कार्यकर्त्या नर्मदा बचाओच्या मेधा पाटकर, स्त्रीवादी सामाजिक कार्यकर्त्या शर्मिला रेगे, स्त्रीवादी कार्यकर्त्या रूथ वनिता, सीपीआयच्या राजकीय कार्यकर्त्या व स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीकुंतला सेन इत्यादी स्त्रिवादी कार्यकर्त्यांनी स्त्रीवादासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

स्त्रियांच्या राजकीय सहभागाबाबत विचार करताना त्याचे संसदेतील, विधानसभेतील आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी १९९३ साली ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली. या घटनादुरुस्तीमुळे ३३ टक्के स्त्रियांना आरक्षण देण्यात आले. २०११ साली स्त्रियांना स्थानिक स्वराज संस्थेत ५० टक्के आरक्षण देण्यात आले.

स्थानिक पातळीवर दिले गेलेले आरक्षण राज्य विधीमंडळे आणि संसद या पातळीवरही लागू केले जावे. यासाठी भारतातील स्त्रीसंघटनांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्रियांना शिक्षण मिळाले. स्त्रिया अल्प प्रमाणात आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या. त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या परंतु त्यांना अजूनही राज्याच्या आणि राष्ट्राच्या राजकारणात पुरुषांच्या बरोबरीने स्थान नाही. इतकेच काय कुटुंबामध्येही तिला दुय्यम स्थान आहे. आज स्था. स्व. संस्थेतील ५० टक्के आरक्षणामुळे स्त्रिया ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका याठिकाणी चांगल्या पध्दतीने कार्य करत आहेत. गावांचा, शहरांचा विकास तिच्या नेतृत्त्वाखाली चांगल्या पध्दतीने होवू लागला आहे. परंतु तिचे नेतृत्व जिल्हा परिषद अध्यक्ष किंवा महापौर येथे पर्यंतच सिमीत आहे. लोकसभा व राज्याच्या विधानसभांमधील स्त्री प्रतिनित्व अल्प दिसते. १७ व्या लोकसभेत स्त्री प्रतिनिधीत्वाचे प्रमाण १४ टक्के आहे. तर महाराष्ट्राच्या २०१९ च्या विधानसभेत ८.३ टक्के इतकेच स्त्री प्रतिनिधीत्व आहे. जोपर्यंत सर्वच राजकीय पक्ष स्त्री प्रतिनिधीत्वाबाबत गांभिर्याने घेत नाहीत आणि त्यांना पुरुषांच्याबरोबरीने उमेदवारी देत नाहीत तोपर्यंत त्यांच्या प्रतिनिधीत्वाचे प्रमाण वाढणार नाही आणि राजकीय सहभागही वाढणार नाही. त्यासाठी स्त्रीसंघटनांनी जागरुक झाले पाहिजे. महिलांना कायदेमंडळात व राज्य विधीमंडळात ५० टक्के आरक्षण मिळाले पाहिजे तरच त्यांचा राजकीय सहभाग वाढेल. त्यांचे प्रतिनिधीत्व वाढल्यामुळे कायदेमंडळात त्यांचे प्रश्न सोडविले जातील आणि एकूणच स्त्रियांच्या विकासाला चालना मिळेल. परंतु यासाठी भारतातील स्त्रियांचा सर्वच राजकीय, सामाजिक क्षेत्रात सहभाग वाढणे गरजेचे आहे. स्त्रिया स्वत:ला राजकारणापासून अलिप्त ठेवतात किंवा स्त्रीसंघटनाही निवडणुकीच्या राजकारणापासून अलिप्त राहतात. पक्षीय राजकारण, राजकीय डावपेच, सत्तेसाठीचा संघर्ष, पक्षांतर्गत राजकारणातील सहभाग, विविध कारखाने व महामंडळांतील राजकारण व सत्ता संपादनातील भूमिका यात स्त्रियांनी प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे. त्याचबरोबर राजकारणातील हिंसाचार, जमातवाद, गुंडगिरी, भ्रष्टाचार, पैशांचा वापर हे अडथळे स्त्रियांच्या राजकीय सहभागातील अडथळे आहेत. शिक्षण, आर्थिक सबलीकरण, संपत्तीत समान वाटा, कौटुंबिक पाठिंबा, स्त्रीसंघटनांने प्रयत्न घटनात्मक आरक्षण याआधारे स्त्रियांचे राजकारणातील प्रमाण वाढून स्त्रियांचा विकास साधता येईल.

**निष्कर्ष :—**

प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील स्त्रीवादाचा अभ्यास केला असता असे म्हणता येईल की,

१. स्त्रियांना मिळणाऱ्या अन्यायकारक वागणुकीचे कारण लिंगभेद आहे. मानवी जीवनाच्या सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात लिंगभेदावर आधारलेली असमानता दिसून येते.
२. स्त्रीवादी संघटना असमानता, लिंगभेद कमी करण्याचा प्रयत्न करीत होत्या आणि आहेत परंतु यासाठी स्त्रीवादी संघटनांनी अधिक प्रयत्नशील राहिले पाहिजे.
३. १९८० नंतर स्त्रिया अधिक प्रमाणात शिक्षित झाल्या. नोकरी करु लागल्या परंतु त्या पध्दतीने स्त्रीप्रश्नांचे स्वरुप व समस्याही बदलल्या. हिंसा, बलात्कार आणि अन्याय, हुंडा, स्त्रीभ्रूणहत्या यात वाढ झाली. थोडक्यात 'माणूस' म्हणून आजही तिला समाजात चांगली वागणूक मिळत नाही. यासाठी स्त्री संघटनांनी जास्त बळकट बनून समस्या सोडविल्या पाहिजेत व स्त्रियांवरील अन्याय दूर केला पाहिजे.
४. स्त्रियांसंबंधीचे कायद्याची अंमलबजावणी ठोस पध्दतीने झाली पाहिजे.
५. स्त्रीवादी संघटनांनी जात, जमातवाद, राजकीय भिन्नता, राजकीय पक्षाचे वर्चस्व या बाबी बाजूला ठेवून स्त्रियांच्यासाठी त्याच्या विकासासाठी प्रयत्नशील राहीले. यासाठी राजकारणापासून अलिप्त न राहता राजकीय पक्षात पुरुषांच्या बरोबरीने आपले स्थान निर्माण केले पाहिजे.
६. स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण मिळाल्यामुळे स्त्रिया राजकीय क्षेत्रात सक्षमतेने कार्य करु लागल्या आहेत. तेव्हा त्यांना संसदेत व राज्यविधीमंडळात ५० टक्के आरक्षण

मिळालेच पाहिजे. कारण सामाजिक परिवर्तनासाठी प्रथम राजकीय अलिप्तता न ठेवता 'सत्ता' व 'निर्णय निर्धारणातील भूमिका' स्त्रियांच्या हातात आली पाहिजे. यासाठी जो राजकीय पक्ष स्त्रियांसाठी ठोस पाऊले उचलेल. त्यांना निवडणुकीत पुरूषांच्या बरोबरीने उमेदवारी देईल त्याच पक्षाला स्त्रीवादी संघटनांनी, कार्यकर्त्यांनी आणि स्त्री मतदारांनी पाठिंबा दिला पाहिजे. तरच स्त्री विकासाचे, स्त्री समानतेचे स्वप्न प्रत्यक्षात येईल.

**संदर्भ :—**

१. गांधी नंदिता, शाह नंदिता, स्त्री संघर्षाची नवी रुपे, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, प्रथमावृत्ती, १९९४, पृ. ७
२. Kaushik Vijay, Sharma Bela Rani, Women in the Developed World, 'Women and Social Movements', Sarup and Sons,New Delhi, 1998, Page No. 203
३. गांधी नंदिता, शाह नंदिता, स्त्री संघर्षाची नवी रुपे, पॉप्युलर प्रकाशन, अनुवाद — भा. रा. भागवत मुंबई, ऑक्टोबर १९९४, पृ. क्र. २
४. पाटील भारती, स्त्रियांचा सत्तेतील सहभाग, समाजवादी प्रबोधिनी, प्रबोधन प्रकाशन, ज्योती, इचलकरंजी, पृ. क्र. २७
५. गांधी नंदिता, शाह नंदिता, स्त्री संघर्षाची नवी रुपे, पॉप्युलर प्रकाशन, अनुवाद — भा. रा. भागवत मुंबई, ऑक्टोबर १९९४, पृ. क्र. ५
६. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ३५१
७. कित्ता, पृ. क्र. ३५५, ३५७
८. दातार छाया, चौदावे विचारवेध संमेलन, शिरुर,भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते आयाम, पृ. क्र. २४, २५
९. कित्ता, पृ. क्र. २६
१०. महाराष्ट्र टाईम्स २७ नोव्हेंबर २०१६
११. महाराष्ट्र टाईम्स २१ डिसेंबर २०१९
१२. महाराष्ट्र टाईम्स ३१ जानेवारी २०२०
१३. तडवलकर (चौधरी) नंदिनी, महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान, अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड, पृ. क्र. १८२